# <u>नियमित दिवाणी मुकदमा नंबर ३८६/२०१७</u>
## <u>नि. ५ खालील आदेश</u>

सदर कामी आज रोजी प्रस्तुत प्रकरण नि.५ वर अंतिम आदेशाकरिता नेमले गेलेले आहे. याकामी नि.५ वर वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे वकिलांचा अंतिम युक्तीवाद दि.०४/०९/२०१८ रोजी ऐकण्यात आला होता. त्यानंतर याकामी त्रयस्थ इसम म्हणून प्रतिवादी क्र.४ व ५ यांना दि.१९/१०/२०१८ रोजीच्या आदेशाने सामील करण्यात आले. त्यानंतर सदर प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी नि.६७ वर दाव्यास कैफियत व ताकीद अर्ज नि.५ याला आपले म्हणणे दि.१६/०१/२०१९ रोजी दाखल केलेले आहे. मात्र प्रतिवादी क्र.४ व ५ यांना नि.५ वर युक्तीवाद सादर करण्याची संधी मिळालेली नाही. दि.०४/०९/२०१८ नंतर घडलेल्या सदर घडामोडींचा विचार करता प्रतिवादी क्र.४ व ५ यांना नि.५ वर युक्तीवाद करण्याची संधी देणे जरुरीचे ठरणार आहे. त्याचप्रमाणे दि. ०४/०९/२०१८ नंतर याकामी वरील घडामोडींमुळे त्याचप्रमाणे इतर निशाणी अर्जांच्या चौकशी व निर्णयामुळे गेलेला प्रदीर्घ कालावधी विचारात घेता, वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा नि.५ वर पुन्हा युक्तीवाद ऐकणे जरुरीचे ठरते. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

निशाणी ५ तुर्तातुर्त ताकीद अर्जावर वादी व सर्व प्रतिवादींनी पुढील तारखेस फेरयुक्तीवाद सादर करावयाचा आहे.

सही/-

सांगली (खा. अ. भेंडवडे)

दिनांक १८/०४/२०१९ ५ वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

सांगली